| MHAH070004962019 | | | |
|---|---|---|---|
| | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयाकडील दाखल तारीख | : | १३/०३/२०१९ |
| | प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयाकडील नोंदणी तारीख | : | १३/०३/२०१९ |
| | सत्र न्यायालयाकडील दाखल दिनांक | : | २६/०८/२०१९ |
| | नोंदणी दिनांक | : | २६/०८/२०१९ |
| | निकाल दिनांक | : | १०/१२/२०२५ |
| | कालावधी | : | ०६ वर्षे ०८ महिने २७ दिवस |

भाग अ

अतिरिक्त सत्र न्यायाधीश, संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर
येथील न्यायालयात.
(न्यायाधीश – मंदार नेरलेकर)
(न्यायनिर्णय दिनांक – १० डिसेंबर २०२५)

सत्र खटला क्र. ६२/२०१९
(जुना नियमित फौजदारी खटला क्र.९६/२०१९)
निशाणी क्र.६९

भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३५३, ३२३, ५०४, ५०६ सह १४९
गु.र.क्र. ४९ सन २०१८ घारगाव पोलिस ठाणे.

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे<br>घारगाव पोलीस ठाणे,<br>ता. संगमनेर,जिल्हा – अहिल्यानगर. |
| अभियोग पक्षातर्फे | सरकारी अभियोक्ता श्री. एस. ए. वाकचौरे |
| आरोपी | १. बाळासाहेब कारभारी डोलनर<br>वय –४२, उद्योग – शेती, |

| | |
|---|---|
| | २. मंगल बाळासाहेब डोलनर<br>वय –३२, उद्योग – शेती,<br><br>३. मनिषा अशोक डोलनर<br>वय –३२, उद्योग – शेती,<br><br>४. नंदा भाऊसाहेब डोलनर<br>वय –३७, उद्योग – शेती,<br><br>५. सुरज भाऊसाहेब डोलनर<br>वय –१९, उद्योग – शेती,<br><br>९. भाऊसाहेब कारभारी डोलनर<br>वय –४८, उद्योग – शेती,<br><br>सर्व रा. मांडवे बुद्रुक,<br>ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर. |
| आरोपींचे विधीज्ञ | श्री. ए. डी. हजारे |

भाग ब

| | |
|---|---|
| घटनेचा दिनांक | २३/०४/२०१८ |
| प्रथम माहिती/फिर्याद दिल्याचा दिनांक | २३/०४/२०१८ |
| दोषारोपाचा दिनांक | १३/०३/२०१९ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०७/०७/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २४/०१/२०२३ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | -- |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १०/१२/२०२५ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, जर असेल. | -- |

आरोपींची माहिती

| आरोपीचा दर्जा | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सुटल्याचा दिनांक | दोषारोपाचे कलम | काय निर्दोष सोडण्यात आले किंवा शिक्षा | शिक्षा ठोठावली | खटला सुरु असताना कलम ४२८ |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | केली | | फौ.प्र.स. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बाळासाहेब कारभारी डोलनर | ०२.०५. २०१८ | ०२.०५. २०१८ | भा.द.सं.कलम १४३, १४७, ३५३, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ | निर्दोष मुक्तता | --- | --- |
| २. | मंगल बाळासाहेब डोलनर | ०२.०५. २०१८ | ०२.०५. २०१८ | भा.द.वि.कलम १४३, १४७, ३५३, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ | निर्दोष मुक्तता | --- | --- |
| ३. | मनिषा अशोक डोलनर | ०२.०५. २०१८ | ०२.०५. २०१८ | भा.द.वि.कलम १४३, १४७, ३५३, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ | निर्दोष मुक्तता | --- | --- |
| ४. | नंदा भाऊसाहेब डोलनर | ०२.०५. २०१८ | ०२.०५. २०१८ | भा.द.वि.कलम १४३, १४७, ३५३, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ | निर्दोष मुक्तता | --- | --- |
| ५. | सुरज भाऊसाहेब डोलनर | ०२.०५. २०१८ | ०२.०५. २०१८ | भा.द.वि.कलम १४३, १४७, ३५३, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ | निर्दोष मुक्तता | --- | --- |
| ९. | भाऊसाहेब कारभारी डोलनर | ०२.०५. २०१८ | ०२.०५. २०१८ | भा.द.वि.कलम १४३, १४७, ३५३, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ | निर्दोष मुक्तता | --- | --- |

भाग क

सरकारी पक्ष साक्षीदार

अ. सरकार पक्ष

| सा.क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | दशरथ सखाराम वायळ | फिर्यादी | १७ |
| २. | पोपट सिताराम खेमनर | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | १९ |
| ३. | देविदास सिताराम खेमनर | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | २५ |
| ४. | सविता पोपट खेमनर | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ५० |
| ५. | मंगल देविदास खेमनर | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ५१ |
| ६. | कैलास माणिकराव परांडे | तपासी अंमलदार | ५२ |

ब. बचाव पक्ष, जर असेल तरः

| क्रमवारी | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयीन साक्षीदार, जर असेल तरः

| क्रमवारी | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| -- | -- | -- |

सरकारी पक्षाने दिलेल्या निशाण्या

अ. सरकार पक्ष

| अ.क्र. | निशाणी नंबर | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी १८ | फिर्याद/प्रथम माहिती |
| २. | निशाणी ५३ | घटनास्थळ पंचनामा |
| ३. | निशाणी ५४ | सविता खेमनर यांचा जबाब |
| ४. | निशाणी ५५ | मंगल खेमनर यांचा जबाब |

ब. बचाव पक्ष

| अ.क्र. | निशाणी नंबर | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

क. न्यायालयीन निशाणी

| अ.क्र. | निशाणी नंबर | वर्णन |
|---|---|---|
| १ | निशाणी ५७ ते ६२ | भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ३५१ प्रमाणे आरोपींचे निवेदन |

ड. भौतिक वस्तू

| अ.क्र. | भौतिक वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## – न्यायनिर्णय –

( दिनांक १० डिसेंबर २०२५ )

### अभियोगपक्षाचे कथनः–

१. निशाणी १८ चे प्रथम माहिती/फिर्यादीमध्ये असे कथन आहे की, नियमित दिवाणी दावा क्र.७५/२०११ मधील सिताराम बळवंत खेमनर यांचे अर्जाची सुनावणी होवुन न्यायालयाचे जा.क्र.११५०/२०१८ दिनांक १८/०४/२०१८ पत्रान्वये बंदोबस्त देणेबाबत कळविल्याने दि.२३/०४/२०१८ रोजी पोलीस निरिक्षक यांचे आदेशाने पोलीस हवालदार दशरथ वायळ, सहायक फौजदार जी. एस. शिंदे, महिला पोलीस शिपाई झावरे हे बंदोबस्तासाठी सिताराम खेमनर यांचे गट नंबर ३१

मध्ये पोचले.

२. प्रथमखबर मध्ये पुढे असे नमूद आहे की, गट क्र.३१ मध्ये पोपट सिताराम खेमनर, सिताराम बळवंता खेमनर, देविदास सिताराम खेमनर, लहानबाई सिताराम खेमनर, सविता पोपट खेमनर व मंगल देविदास खेमनर असे न्यायालयाचे आदेशानुसार जुन्या रस्त्याने ऊसाचे पिक कारखान्याला पाठविण्यासाठी गट नं. ३१ मधुन रस्ता तयार करत असताना रस्त्यात बाळासाहेब कारभारी डोलनर याने ऊसाचे, टॉमेटोचे पिक करुन बंद केला म्हणुन अर्जदार यांनी न्यायालयाकडून उपरोक्त नमूद आदेश आणून पोलीस बंदोबस्त शुल्क भरुन बंदोबस्त मागणी केल्याने सदर बंदोबस्ताबाबत पोलीस हवालदार वायळ व इतर हजर असतांना दुपारी ०३.१५ चे सुमारास बाळासाहेब कारभारी डोलनर, मंगल बाळासाहेब डोलनर, मनिषा अशोक डोलनर, नंदा भाऊसाहेब डोलनर, सुरज भाऊसाहेब डोलनर, ईश्वर अशोक डोलनर, रविंद्र अशोक डोलनर, शुभम बाळासाहेब डोलनर व भाऊसाहेब कारभारी डोलनर यांनी संगमनताने सिताराम खेमनरेचे कुटुंबातील उपरोक्त नमूद लोकांना शिवीगाळ, दमदाटी करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी देऊन सरकारी कामात अडथळा आणला. सदर रस्त्याचे काम चालु असतांना गैरकायदयाची मंडळी जमवून वरील लोकांना मारहाण करुन रस्त्याचे काम बंद पाडले. या आशयाची प्रथम माहिती/फिर्याद पोलीस हवालदार दशरथ वायळ यांनी दिली. त्यानुसार भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३५३, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ अन्वये गुन्हा रजि. क्र.४९/२०१८ दि.२३/०४/२०१८ रोजी सायंकाळी ०७.२५ वा. घारगाव पोलीस ठाणे येथे नोंद करण्यात आला.

३. घारगाव पोलीस ठाण्याचे सहायक फौजदार यांनी तपासांती बाळासाहेब कारभारी डोलनर, मंगल बाळासाहेब डोलनर, मनिषा अशोक डोलनर, नंदा भाऊसाहेब

डोलनर, सुरज भाऊसाहेब डोलनर व भाऊसाहेब कारभारी डोलनर यांच्या व तीन विधी संघर्षग्रस्त बालक यांच्या विरुद्ध दि.१३/०३/२०१९ रोजी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचेकडे उपरोक्त नमुद कलमांन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी दि.२४/०७/२०१९ चे आदेशाने खटला या न्यायालयाकडे वर्ग केला.

५. माझे सुविद्य पुर्वाधिकारी यांनी दिनांक ०७/०७/२०२२ रोजी भा.दं.सं.कलम १४३, १४७, ३५३, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ चा दोषारोप निश्चित केला. आरोपी क्र.१ ते ५ व ९ यांनी ते दोषारोप नाकारले. खोटा गुन्हा नोंदविल्याचा आरोपींचा बचाव आहे.

६. सुविद्य सरकारी वकील श्री. एस. ए. वाकचौरे यांनी युक्तीवाद केला की, अभियोग पक्षाने दोषारोपपत्रातील गुन्हे आरोपींविरुध्द सिद्ध केले आहेत. आरोपींना कडक शासन व्हावे.

७. आरोपीचे सुविद्य वकील श्री. ए. डी. हजारे यांनी युक्तीवाद केला की, रस्ता काढून द्यावा असा न्यायालयाचा आदेश नव्हता. तो आदेश ऊस तोडण्याबाबत होता. दि.१६/०४/२०१८ च्या आदेशानुसार पोलीस घटनास्थळी दि. २३/०४/२०१८ रोजी गेले. पोलीस ठाण्यापासून घटनास्थळ केवळ २५ मिनिटांचे अंतरावर असून व फिर्यादी स्वतः पोलीस असून देखिल फिर्याद देण्यास ४ तासांचा विलंब आहे. फिर्यादीने त्याचे उलटतपासात मान्य केले की, त्याला मारहाण झाले नाही व कागद फाटले नाही. अन्य साक्षीदारांना मारहाण झाल्याबाबत वैद्यकीय पुरावा सादर नाही. सिताराम खेमनर व त्याचे कुटुंबातील सदस्यांनी आरोपींच्या उभ्या पिकातून रस्ता सुरु केला म्हणून आरोपींनी त्याला विरोध केला. त्यावेळी सिताराम खेमनर व त्यांचे

कुटुंबातील सदस्यांनी आरोपींना मारहाण केली त्याबाबत गुन्हा रजि. क्र.५०/२०१८ नोंद झाला. घटनास्थळ पंचनामा कधी सुरु करुन कधी संपवला याचा उल्लेख नि.५३ चे पंचनाम्यामध्ये नाही. आरोपींनी फिर्यादीच्या शासकीय कामात कोणताही अडथळा केला नाही. गुन्हे सिद्ध करण्यासाठी कोणताही तटस्थ साक्षीदार तपासलेला नाही. घटनास्थळ असलेल्या जमिनीचा ७/१२ उतारा तसेच ज्या न्यायलयाच्या आदेशाने पोलीस मदत मिळाली तो आदेश अभियोगपक्षाने सिद्ध केलेला नाही. आरोपींविरुध्द गुन्हे सिद्ध होत नाहीत.

८. अभियोगपक्षाचे आरोप, आरोपींचा बचाव व उभय पक्षकारांचे सुविद्य वकीलांचा युक्तीवाद विचारात घेता प्रस्तुत खटल्याच्या न्यायनिर्णयासाठी खालील नमूद मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह –

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | दिनांक २३/०४/२०१८ रोजी दुपारी ०३.१५ चे सुमारास गट नं.३१ मांडवे बु., ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर येथे आरोपी क्र.१ ते ५ व ९ आणि तीन विधी संघर्षग्रस्त बालक यांनी बेकायदेशीर जमाव करुन, कर्तव्यावर असलेल्या पोलीसांवर/लोकसेवकांवर बळाचा वापर करुन, गट क्र.३१ मध्ये अपराधिक अतिक्रमण करुन, न्यायालयीन आदेशानुसार गट नं.३१ मधून रस्ता करण्याचे कामास प्रतिबंध करुन भारतीय दंड संहिता कलम १४३ सह १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे का ? | | नाही. |
| २. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र.१ ते ५ व ९ आणि तीन विधी संघर्षग्रस्त बालक यांनी त्यांच्या | | नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशाने पोलीस व सिताराम खेमनर यांचे कुटुंबातील सदस्यांवर बळाचा व हिंसेचा वापर करुन भारतीय दंड संहितेच्या कलम १४७ सह १४९ अन्वये दंगलीचा दंडनीय गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे का ? | | |
| ३. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र.१ ते ५ व ९ आणि तीन विधी संघर्षग्रस्त बालक यांनी बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशाने लोकसेवक पोलीस हवालदार दशरथ वायळ, सहायक फौजदार जी. एस. शिंदे, महिला पोलीस शिपाई झावरे यांचेवर बळाचा वापर करुन त्यांचे शासकीय कर्तव्य पाडण्यापासून परावृत्त करुन त्यांचे शासकीय कामामध्ये अडथळा आणून भारतीय दंड संहितेच्या कलम ३५३ सह १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे का ? | | नाही. |
| ४. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र.१ ते ५ व ९ आणि तीन विधी संघर्षग्रस्त बालक यांनी त्यांच्या बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशाने सिताराम खेमनर व त्यांचे कुटुंबातील सदस्यांना मारहाण करुन भारतीय दंड संहितेच्या कलम कलम ३२३ सह १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे का ? | | नाही. |
| ५. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र.१ ते ५ व ९ आणि तीन विधी संघर्षग्रस्त बालक यांनी बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशाने सिताराम खेमनर | | नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| | व त्याच्या कुटुंबातील सदस्यांचा जाणूनबुजून अपमान केला आणि त्यामुळे सार्वजनिक शांततेचा भंग होईल या स्वरुपाची चिथावणी त्यांना देऊन भारतीय दंड संहितेच्या ५०४ सह १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे का ? | | |
| ६. | उपरोक्त नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपी क्र.१ ते ५ व ९ आणि तीन विधी संघर्षग्रस्त बालक यांनी बेकायदेशीर जमावाच्या समान उद्देशाने सिताराम खेमनर व त्याचे कुटुंबातील सदस्यांना जीवे मारण्याची धमकी देऊन, धाकदपटशा करुन भारतीय दंड संहितेच्या कलम ५०६ सह १४९ अन्वये शिक्षापात्र गुन्हा केला असे अभियोग पक्षाने सिद्ध केले आहे का ? | | नाही. |
| ७. | आदेश ? | | आरोपींची निर्दोष मुक्तता. |

<u>–कारणमिमांसा–</u>

<u>मुद्दे क्र.१ ते ६ करीता</u> –

९. उपरोक्त नमूद मुद्दे परस्परांशी निगडीत असलेमुळे साक्षीपुराव्यांचे विश्लेषण व कारणमिमांसेची पुनरावृत्ती टाळणेकरीता त्यांचे विवेचन संयुक्त केले आहे.

<u>दोष दर्शक पुरावा</u> –

१०. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ दशरथ वायळ यांचे नि.१७ चे साक्षी आधारे अभियोग पक्षाने प्रथम माहिती/फिर्याद नि.१८ सिद्ध केली. त्यांची सदर साक्ष ही नि.१८ चे फिर्यादीमधील मजकुराशी सुसंगत आहे. नि.१८ मधील सदर मजकुराचे विश्लेषण या न्यायनिर्णयाचे परिच्छेद क्र.१ व २ मध्ये केलेले आहे त्यामुळे त्याची

पुनरावृत्ती टाळली आहे.

११. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ पोपट खेमनर यांची नि.१९ ची साक्ष व साक्षीदार क्र.३ देविदास खेमनर यांची नि.२५ ची साक्ष ही साक्षीदार क्र.१ दशरथ वायळ यांची नि.१७ ची साक्ष व नि.१८ चे फिर्यादीशी सुसंगत व पुरक आहे.

१२. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.६ कैलास परांडे यांनी त्यांचे नि.५२ चे साक्षीत असे सांगितले की, २०१८ साली ते घारगाव पोलीस ठाण्यात साहायक फौजदार असताना सदर पोलीस ठाण्याचे गुन्हा रजि. क्र.४९/२०१८ चा तपास त्यांनी केला. घटनास्थळी जाऊन दोन पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा नि.५३ तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदवले. साक्षीदार सविता व मंगल खेमनर यांचे जबाब त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदवले. त्यांचे जबाबातील अनुक्रमे 'अ' व 'ब' अक्षराने अधोरेखित मजकुर त्यांचे सांगण्याप्रमाणे नोंदवला. सदर मजकुरास नि.क्र.५४ व ५५ देण्यात आला. सविता खेमनर यांना वैदयकीय तपासणीसाठी यादीसह पाठविले. दि.०२/०५/२०१८ रोजी आरोपी क्र.१ ते ५ व ९ यांना अटक केली. सदर आरोपींना साक्षीदारांनी न्यायालयात ओळखले. तपासीअंती न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

<u>अभियोग पक्षाचे पुराव्यातील उणीवा, त्रुटी, कमतरता</u> -

१३. प्रथम खबर नि.१८ मध्ये नमूद असलेल्या –

i) नियमित दिवाणी दावा क्र.७५/२०११ मधील सिताराम खेमनर यांचा अर्ज, त्यावरील न्यायालयाचा आदेश, न्यायालयाचे त्याबाबतचे जा.क्र.११५०/ २०१८ ता.१८/०४/२०१८ चे पत्र.

ii) उपरोक्त आदेश व त्या पत्राला अनुसरुन पोलीस निरिक्षक यांचा आदेश.

या स्वरुपाचा पुरावा अभियोग पक्षाने सादर केलेला नाही.

१४. आरोपींनी दाखल केलेली सही शिक्याची नक्कल नि.६५ वाचली असता असे निदर्शनास येते की, नियमित दिवाणी दावा क्र.७५/२०११ चे वादी सिताराम खेमनर यांनी सदर दाव्यातील प्रतिवादी भाऊसाहेब कारभारी यांचे विरुध्द अर्ज नि.६५ देऊन असे कथन केले की, नि.५ चे मनाई आदेशानुसार अ, ब ,क, ड या रस्त्यास प्रतिवादींनी हरकत अडथळा करु नये. वादीच्या गट नं.३१ मध्ये ६१ गुंठे क्षेत्रात ऊस आहे. प्रतिवादी रस्त्यास हरकत अडथळे करत असल्यामुळे ऊस तोड होई पावेतो व ऊसाची लागवड होई करीता पोलीस मदत मिळणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमूद अर्जावर दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, संगमनेर यांनी दि.१६/०४/२०१८ रोजी आदेश केला की, गट नं.३१ मधील ६१ गुंठे क्षेत्रातील ऊस तोड करणेकामी एक महिला व एक पुरुष पोलीस यांची मदत पोलीस निरिक्षक, घारगाव पोलीस ठाणे यांनी वादीस दयावी.

१५. उपरोक्त नमूद आदेशामध्ये रस्त्याबाबतचा कोणताही आदेश नाही. त्यामुळे आरोपींनी रस्त्याचे काम बंद पाडले हा प्रथम खबर नि.१८ मधील आरोप उपरोक्त नमूद सुविद्य दिवाणी न्यायालयाचे आदेशाशी सुसंगत नाही.

१६. आरोपींचे वकिलांनी घेतलेल्या उलटतपासात अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.१ दशरथ वायळ यांनी दिलेल्या महत्वाच्या कबूली–

i) सदरील चार अर्जदार हे नविन रस्ता काढण्याच्या प्रयत्नात होते.

ii) सदरील चार अर्जदार, आरोपींच्या जमिनीतून रस्ता काढत असल्याने दोन गटात मारामारी झाली होती.

iii) **घटनेच्यावेळी आरोपींनी मला किंवा माझ्यासोबत असणा–या दोन पोलीसांना मारहाण केली नव्हती.**

१७. गट क्र.३१ मधील ऊस तोडण्यासाठी मिळालेल्या पोलीस मदतीचा फिर्यादी पक्षाने चुकीचा अर्थ लावून पोलीस मदतीने रस्ता करण्याचा प्रयत्न केला असे अभियोग पक्षाचे साक्षीदारांचे साक्षीव्दारे निदर्शनास येते.

१८. आरोपींचे सुविद्य वकिलांनी घेतलेल्या अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.२ पोपट सिताराम खेमनर चे उलट तपासातील कबूली–

i) **घटनेच्यावेळी आमच्या गट नंबर ३१ या जमिनीत येण्यासाठी आरोपींच्या जमिनीच्या उत्तरेकडून रस्ता अस्तित्वात होता.**

ii) **आरोपींच्या जमिनीच्या उत्तर बाजूला असणा–या रस्त्याचा वापर करण्यास आरोपींना हरकत अडथळा करु नये म्हणून न्यायालयाने सदरील दिवाणी दाव्यात आमच्याविरुध्द मनाई हुकूम दिलेला होता.**

iii) **घटनेच्यावेळी आम्ही पोलीसांसमोर नविन रस्ता तयार करण्यास सुरुवात केली होती.**

iv) **माझ्या जमिनीतून नविन रस्ता करु नका असे म्हणत आरोपी क्र.१ ने आम्हाला विरोध केला होता.**

v) **त्यावेळी कोयता माझ्या हातात होता व त्या कोयत्याचा मार आरोपी नंबर १ ला लागला होता.**

vi) **आरोपी नंबर १ ला त्यावेळी कोयत्याचा मार लागल्याने, त्याने व त्याच्या घरच्या लोकांनी माझ्या कुटुंबाविरुध्द फौजदारी केस केली होती व ती सध्या कोर्टात चालू आहे.**

१९. नि.६६ ची फिर्याद वाचली असता असे निदर्शनास येते की, फिर्यादी बाळासाहेब डोलनर व आरोपी सिताराम खेमनर व इतर १० यांच्या शेतजमीनी ऐकमेकांचे शेजारी आहेत. पोपट खेमनर व सिताराम खेमनर यांनी बाळासाहेब डोलनर

यांचे ७० आर क्षेत्रामध्ये अतिक्रमण केले असून सिताराम खेमनर यांनी रस्ता मिळणेबाबत न्यायालयात दिवाणी दावा क्र.७५/२०११ दाखल केला होता. न्यायालयाचे आदेशाने बाळासाहेब डोलनर यांचे जमिनीची मोजणी केली असता सिताराम खेमनर यांचेकडे ७० आर क्षेत्र जास्त निघाले असून त्यांनी सदर जमिन आज पावेतो त्यांना दिलेली नाही. सिताराम खेमनर व त्यांची मुले सन २०१७ मध्ये १ हेक्टर जमीन बाळासाहेब डोलनर यांना विकण्याचे ठरल्याने त्यांनी वेळोवेळी पैसे दिले होते ते पैसे सुध्दा परत दिले नाही. दि.२३/०४/२०१८ रोजी दुपारी ०२.०० वाजेचे सुमारास सिताराम खेमनर व इतर बाळासाहेब डोलनर यांचे गट नं.३१ मध्ये आले व ऊसाचे पीक तोडण्यास सुरुवात केली व दुपारी ३.१५ चे सुमारास टॉमेटो शेतीच्या बांधावर आले असता बाळासाहेब डोलनर यांनी ''बांध खोदू नका, ऊसाचे नुकसान करु नका व मोकळया जागेतून रस्ता तयार करा,'' असे म्हटल्याचा राग आल्याने बाळासाहेब डोलनर यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्याने मारहाण केली. बाळासाहेब डोलनर यांचे घरातील लोक भांडण सोडविण्यासाठी आले असता त्यांना देखिल लाथाबुक्कयाने मारहाण केली व पोपट खेमनर यांनी हातातील ऊस तोडणीचा कोयता बाळासाहेब डोलनर यांचे डोळयाचे शेजारी डावे गालावर मारुन जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली.

२०. नि.६७ चे दोषारोपपत्राची सहीशिक्क्याची नक्कल वाचली असता गुन्हा रजिस्टर क्र.५०/२०१८ चे तपासाअंती तपासी अधिकारी पोलीस हवालदार दशरथ वायळ यांनी सिताराम खेमनर व अन्य सहा आरोपी तसेच दोन विधी संघर्षग्रस्त बालक यांचे विरुध्द संगमनेर न्यायदंडाधिकारी यांचे कडे दि.१५/०२/२०२० रोजी भारतीय दंड संहिता कलम ३२४, ३२३, १४१, १४३, १४७, ५०४, ५०६ सह १४९ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

२१. उपरोक्त नमूद दोषारोपपत्रान्वये दाखल नियमित फौजदारी खटला क्र.९७/२०२० चा न्यायानिर्णय दि.१०/१०/२०२४ रोजी होऊन न्यायदंडाधिकारी यांनी आरोपी क्र.१ ते ७ यांना सदर खटल्यातील गुन्हयांसाठी निर्दोष मुक्त केले.

२२. आरोपींचे सुविद्य वकिलांनी घेतलेल्या अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.३ देविदास सिताराम खेमनर चे उलट तपासातील कबूली–

i) कथित घटनेनंतर आम्ही फिर्याद देण्यासाठी पोलीस स्टेशनला सर्वजण एकत्र गेलो होतो.

ii) त्यादिवशी घटनेबाबत या प्रकरणातील आरोपी नंबर १ ने माझ्या व माझ्या नातेवाईकाविरुध्द पोलीसात फिर्याद दिली होती व त्याबाबतची केस न्यायालयात चालू आहे.

२३. साक्षीदार क्र.४ सविता खेमनर व ५ मंगल खेमनर यांनी त्यांच्या अनुक्रमे नि.५० व ५१ चे साक्षीत असे सांगितले की, न्यायालयात हजर आरोपींना त्या ओळखतात. ते त्यांचे शेजारी राहतात. सदर गावात त्यांची गट नं. ३१ ही जमीन आहे. न्यायालयात हजर आरोपींशी रस्त्यावरून त्यांचा **किरकोळ वाद झाला होता**. त्यावेळी पोलीस आले होते. दिनांक २३.०४.२०१८ रोजी त्यांच्या शेतात **किरकोळ प्रकार झाला होता**. **प्रकार काय झाला हे सविस्तर सांगता येणार नाही**.

२४. आरोपींचे सुविद्य वकिलांनी घेतलेल्या अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र.६ तपासी अधिकारी कैलास माणिकराव परांडे यांचे उलट तपासातील कबूली–

i) वादातून परस्परांच्या एकमेकांविरूध्द घारगांव पोलीस ठाण्यात ब–याच तक्रारी झाल्या होत्या का?, हे मला सांगता येणार नाही.

ii) **साक्षीदार व आरोपी यांच्या दरम्यान रस्त्यावरुन वाद होता. त्या वादाबाबत दावा चालू असल्याची माहिती मी घेतली नव्हती.**

iii) रस्त्यासाठी न्यायालयाचा आदेश असल्याची मला माहिती होती.

iv) **दाव्याचा नंबर मला सांगता येणार नाही. नेमका काय आदेश झाला, याची कागदपत्रे मी प्राप्त केली नव्हती.**

v) न्यायालयाच्या आदेशानुसार साक्षीदार रस्ता काढतात का? याची शहानिशा मी केली नाही.

vi) **ज्या जमिनीचा वाद होता, त्याचा गट नंबर मला माहिती होता. त्याचा ७/१२ उतारा मी घेतला नव्हता.**

vii) **घटनास्थळाच्या आजूबाजूला लोकवस्ती आहे. घटनास्थळाच्या आजूबाजूला राहणा–या लोकांचे जबाब मी घेतले नव्हते.**

viii) दि.२३/०४/२०१८ रोजी बाळासाहेब डोलनर च्या प्रथम खबर आधारे यातील साक्षीदार १ ते ५ यांच्याविरूध्द गु.र.नं. ५०/२०१८ नोंद झाला होता का? हे मला माहिती नाही.

ix) सदर गुन्हयाच्या तपासाची मी माहिती घेतली नाही.

x) **आरोपी व साक्षीदार यांच्या दरम्यान बाचाबाची व हाणामारी होवून परस्परविरोधी दोन गुन्हे दाखल झाले.**

xi) **घटनास्थळी गेलेले पोलीस कर्मचारी व आरोपी यांचा काही वाद झाला नाही.**

निर्णयात्मक विश्लेषणः–

२५. उपरोक्त परिच्छेद क्र.१३ ते २४ मधील विश्लेषण व कारणमिमांसेआधारे असे निदर्शनास येते की, आरोपी व सिताराम खेमनर व त्याचे कुटुंबातील सदस्य यांचे दरम्यान दिवाणी व फौजदारी स्वरुपाचे वाद आहेत. सिताराम खेमनर व त्याचे कुटुंबातील सदस्यांनी दि.२३/०४/२०१८ रोजी बाळासाहेब डोलनर यांचे शेतात येऊन बाळासाहेब व त्यांचे कुटुंबातील सदस्यांना शिवीगाळ व लाथाबुक्क्याने मारहाण

केली. पोपट खेमनर ने कोयता बाळासाहेब खेमनर चे डोळयासमोर मारुन त्यांना जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली. त्याबाबत झालेला नियमित फौजदारी खटला क्र.९७/२०२० दि.१०/१०/२०२४ रोजी निकाली होऊन त्या गुन्हयातील सिताराम खेमनर व अन्य यांची निर्दोष मुक्तता झाली.

२६. अभियोग पक्षाचे प्रत्यदर्शी साक्षीदार क्र.४ सविता खेमनर व क्र.५ मंगल खेमनर यांनी आरोपींविरुध्द कोणतीही दोषदर्शक साक्ष दिली नाही.

२७. ऊसतोडीसाठी पोलीस संरक्षणाचा दिवाणी न्यायालयाचा आदेश नियमित दिवाणी दावा क्र.७५/२०११ मध्ये असताना सिताराम खेमनर व त्याचे कुटुंबातील सदस्यांनी रस्ता करण्याचा प्रयत्न केला. त्याला आरोपींनी आक्षेप घेतला असता उभय पक्षकरांमध्ये भांडणे झाली.

२८. आरोपींविरुध्द दोषदर्शक साक्ष दिलेले साक्षीदार क्र.१ दशरथ वायळ यांचे उपरोक्त परिच्छेद क्र.१६ मधील कबूली व साक्षीदार क्र.२ पोपट खेमनर यांचे उपरोक्त परिच्छेद क्र.१८ मधील कबूली तसेच तपासी अधिकारी साक्षीदार क्र.६ कैलास परांडे यांचे उपरोक्त परिच्छेद क्र.२४ मधील कबूलींच्या पार्श्वभूमीवर भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, ३५३, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ चे गुन्हे आरोपींविरुध्द संशयातीतरित्या सिद्ध करण्यात आभियोग पक्ष अयशस्वी ठरला आहे असा निष्कर्ष उदभवतो.

उपरोक्त् परिछेद क्र.९ ते २८ मधील विश्लेषण व कारणमिमांसेआधारे मुद्दा क्र. १ ते ६ चे निष्कर्ष नकारार्थी आहेत.

<u>मुद्दा क्र.७</u>-

२९. उपरोक्त परिच्छेद क्र. ९ ते २८ मधील पुराव्याचे विश्लेषण व कारणमिमांसा व मुद्दे क्र.१ ते ६ चे नकारार्थी निष्कर्षांचे पार्श्वभुमीवर आरोपींची निर्दोष

मुक्तता करणे आवश्यक आहे.

आदेश

अ. भारतीय दंड संहितेचे कलम १४३, १४७, ३५३, ३२३, ५०४, ५०६ सह १४९ चे दोषारोपातून आरोपी क्र.१ बाळासाहेब कारभारी डोलनर, २. मंगल बाळासाहेब डोलनर, ३. मनिषा अशोक डोलनर, ४. नंदा भाऊसाहेब डोलनर, ५. सुरज भाऊसाहेब डोलनर व ९. भाऊसाहेब कारभारी डोलनर यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ कलम २५८(१) प्रमाणे निर्दोष मुक्त केले आहे.

ब. आरोपींचे बंधपत्र व जामीन रद्द केले आहेत.

MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Digitally signed by MANDAR RAMCHANDRA NERLEKAR
Date: 2025.12.15 11:13:57 +0530

संगमनेर
दिनांक – १०/१२/२०२५

( मंदार नेरलेकर )
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
संगमनेर.